ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# देशाच्या आर्थिक विकासात कृषी पर्यटनाचे योगदान एक अभ्यास

**डॉ. मोहन बळीबा शिंदे**

*सहाय्यक प्राध्यापक,*
*ॲड़.एम.एन. देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राजूर, ता. अकोले, जि. अहिल्यानगर ४२२६०४. (महाराष्ट्र राज्य )*

***Corresponding Author:* डॉ. मोहन बळीबा शिंदे**

**DOI - 10.5281/zenodo.14875029**

**गोषवारा:**

*भारताच्या ग्रामीण भागामध्ये कृषी पर्यटन हा एक उदयोन्मुख असणारा एक उद्योग आहे. अलीकडे कृषी पर्यटन या नवीन संकल्पनेला देशातील लोकांनी उत्स्फूर्त असा प्रतिसाद दाखविला आहे. शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन, त्यांची कार्यपद्धती पाहणे, शेतीच्या कामात भाग घेणे उदा. लागवड करणे, कापणी करणे किंवा जनावरांना खायला देणे, मनोरंजक क्रियाकलापांचा आनंद घेणे (उदा., घोडेस्वारी, मासेमारी किंवा हायकिंग). शेतातील निवासस्थानांमध्ये राहणे. स्थानिक अन्न उत्पादन आणि टिकाऊपणाबद्दल शिकणे. इत्यादी तसेच स्थानिक खाद्य पदार्थांचा अनुभव घेणे, शेतीशी संबंधित विविध शैक्षणिक व मनोरंजनात्मक क्रियाकलापांमध्ये भाग घेणे. पर्यटकाने परंपरागत कृषी पद्धती शिकणे, उत्पादन व फळांचे संकलन कसे करतात ? घरगुती उत्पादनांची चव घेणे. इत्यादी अनुभव घेताना दिसत आहे . कृषी पर्यटन हा शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा एक वेगळा स्रोत होत आहे यातून ग्रामीण भागातील संस्कृती व परंपरा दर्शविणे व त्याचे संवर्धन करणे आज महत्वाचे बनले आहे. शहरी संस्कृतीत जगणाऱ्या तरुणवर्गाला भुईमुगाच्या शेंगा झाडाला येतात कि जमिनीत, बटाटा कुठे उगवितो ? आपल्या घरात येणारे दूध कुठून येते? या सर्वांची माहीती प्रत्यक्ष ग्रामीण पर्यावरणात विशेषतः शेतात जाऊन मिळावी व त्याच बरोबर शेतकऱ्याला उत्पनाचा स्रोत निर्माण व्हावा म्हणून **"देशाच्या आर्थिक विकासात कृषी पर्यटनाचे योगदान एक अभ्यास "** या शीर्षकाखाली अर्थशास्त्राचा एक अभ्यासक व संशोधक म्हणून प्रस्तुत शोध निबंधाचा विस्तृत शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.*

***मूळ शब्द: कृषी पर्यटन,आर्थिक विकास, स्थानिक समुदाय रोजगार, पर्यावरण संवर्धन इत्यादी.***

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१) कृषी पर्यटन या संकल्पनेचा आढावा घेणे.

२) कृषी पर्यटन व आर्थिक विकासातील योगदान याचा अभ्यास करणे .

३) कृषी पर्यटनातून रोजगार निर्मितीचा आढावा घेणे. इत्यादी.

**गृहीतके:**

१) कृषी पर्यटनातून रोजगार संधी उपलब्ध होत आहे.

२) कृषी पर्यटनातून शेतीला भक्कम पूरक व्यवसाय प्राप्त झाला आहे.

3) कृषी पर्यटनातून देशाच्या आर्थिक विकासात भर पडत आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला असून शोधनिबंधातील विवेचन दुय्यम साधनसामग्रीवर अवलंबून आहे. यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, अहवाल ,वृत्तपत्रे व संकेतस्थळ इत्यादीचा उपयोग केला आहे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:**

प्रस्तुत शोध निबंधातून **"देशाच्या आर्थिक विकासात कृषी पर्यटनाचे योगदान एक अभ्यास "** यावर प्रकाश टाकणे हाच मुख्य हेतू आहे.त्यामुळे या शोध निबंधातील निष्कर्ष इतर क्षेत्रासाठी लागू असतीलच असे नाही. हीच या संशोधनाची व्याप्ती व मर्यादा असेल.

**प्रस्तावांना:**

देशाच्या व महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात कृषी पर्यटन ही नवीन संकल्पना शेती क्षेत्रात महत्वाची भूमिका पार पाडत आहे. शेतीला पूरक ठरणाऱ्या कृषी पर्यटन व्यवसायातून तरुण वर्गाला रोजगाराची चांगली संधी प्राप्त होण्याचा मार्ग प्राप्त झाला आहे. कृषी पर्यटनातून पर्यटकांना मार्गदर्शन करणारे गाईड, त्यांची सेवा करणारे कर्मचारी, साफसफाई आणि देखभाल करणारे कर्मचारी यांना नव्याने रोजगार उपलब्ध होतो आहे .स्थानिक हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि रेस्टॉरंट्समध्ये काम करणे. पर्यटकांना ग्रामीण पारंपरिक खाद्यपदार्थांच्या चवीचा आस्वाद देऊन तसेच लयास चाललेल्या स्थानिक कला आणि हस्तकला व्यवसायाला पुन्हा संधी प्राप्त होण्याच्या दृष्टीने **"देशाच्या आर्थिक विकासात कृषी पर्यटनाचे योगदान एक अभ्यास "** या शीर्षकाखाली अर्थशास्त्राचा एक अभ्यासक व संशोधक म्हणून या प्रस्तुत शोधनिबंधातून यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**कृषी पर्यटनाची व्याख्या:**

" कृषी-पर्यटन, ज्याला कृषी-पर्यटन म्हणूनही ओळखले जाते, हा पर्यटनाचा एक प्रकार आहे जो विश्रांतीच्या प्रवासासह कृषी क्रियाकलापांना एकत्रित करतो. यामध्ये शाश्वत पद्धतींचा प्रचार करताना आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला पाठिंबा देताना ग्रामीण जीवन, शेती पद्धती आणि सांस्कृतिक वारसा अनुभवण्यासाठी कार्यरत शेतात किंवा कृषी सेटिंग्जला भेट देणे समाविष्ट आहे. "

थोडक्यात, कृषी पर्यटन म्हणजे पारंपरिक शेती व्यवसायाला जोडून पर्यटनाचा विकास करणे. यामध्ये शेतकरी आणि ग्रामस्थ त्यांच्या शेती, जीवनशैली, संस्कृती, नैसर्गिक साधनसंपत्ती आणि स्थानिक खाद्यपदार्थांच्या माध्यमातून पर्यटकांना आकर्षित करतात. यामुळे शहरी लोकांना ग्रामीण जीवनाचा अनुभव घेता येतो आणि शेतकर्यांना अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत निर्माण होतो.

**कृषी पर्यटनाचे स्वरूप:**

कृषी-पर्यटनाचे स्वरूप त्याच्या मुख्य वैशिष्ट्यांद्वारे समजले जाते.

१) **शेतीशी संबंध:** कृषी-पर्यटन शेती, पशुधन आणि नैसर्गिक वातावरणाशी थेट जोडलेले आहे. कृषी-पर्यटन शहरी आणि ग्रामीण लोकसंख्येतील दरी कमी करते.

२) **शाश्वतता:** कृषी-पर्यटन पर्यावरणपूरक पर्यटनाला प्रोत्साहन देते, पर्यावरणावर होणारा परिणाम कमी करून ग्रामीण लँडस्केप आणि पारंपारिक कृषी पद्धती जतन करण्यात मदत करते.

३) **सांस्कृतिक संवर्धन :**पर्यटकांना स्थानिक परंपरा, पाककृती आणि वारसा यांच्याशी संलग्न होण्यास अनुमती देते.

४) **शैक्षणिक घटक :** कृषी-पर्यटन शेतीचे महत्त्व अधोरेखित करून कार्यशाळा, शेत दौरे आणि प्रात्यक्षिके यासारखे शैक्षणिक अनुभव प्रदान करते.

५) **सामुदायिक विकास :** कृषी-पर्यटन शेतकऱ्यांसाठी अतिरिक्त उत्पन्न निर्माण करून आणि ग्रामीण रोजगाराच्या संधी निर्माण करून स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत करते.

**कृषी पर्यटनाचे महत्त्व:**

१) **आर्थिक महत्व:** कृषी पर्यटनामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळवण्याची संधी

मिळते. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातील उत्पादनांवर आधारित व्यवसाय सुरू करण्याची संधी मिळते, जसे की हस्तकला विक्री, पर्यटकांना ताजे फळे, भाज्या किंवा शेतमाल पुरविणे.

२) **शैक्षणिक महत्व:** पर्यटकांसाठी कृषी पर्यटन शैक्षणिक दृष्टीने फायदेशीर ठरतो. त्यांनी शेतकऱ्यांच्या कामकाजाची आणि सेंद्रिय शेती, जैविक शेती यासारख्या पर्यावरणीय पद्धतींची माहिती घेणे.

३) **संस्कृती व पारंपरिक जीवनशैलीचा प्रसार:** कृषी पर्यटन स्थानिक संस्कृती आणि पारंपरिक शेतकरी जीवनशैलीला नवा पाठिंबा देते. पारंपरिक खाद्यपदार्थ, हस्तकला, आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांचा अनुभव घेणारे पर्यटक ग्रामीण संस्कृतीला ओळखू शकतात.

**कृषी पर्यटनाची उद्दिष्टे:**

१) **शेतकर्यांना आर्थिक पाठबळ मिळवून देणे:** शेतीच्या जोडीने पर्यटन व्यवसायातून शेतकऱ्यांना आर्थिक उत्पन्नाचा नवा स्रोत निर्माण करणे.

**२) ग्रामीण भागाचा विकास:** ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, रोजगार निर्मिती, आणि विकासासाठी कृषी पर्यटनाला चालना देणे.

3) **ग्रामीण संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार:** ग्रामीण जीवनशैली, परंपरा, आणि संस्कृतीचे जतन व प्रचार करणे.

४) **शहरी लोकांना ग्रामीण अनुभव देणे:** शहरी लोकांना शेतात काम करणे, पशुपालन, नैसर्गिक जीवनशैली आणि स्थानिक खाद्यपदार्थांचा अनुभव देणे.

५) **पर्यावरण संवर्धन:** नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन करून पर्यावरणपूरक पर्यटनाला प्रोत्साहन देणे.

६) **स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन:** ग्रामीण भागातील हस्तकला, खाद्यपदार्थ, आणि कृषी उत्पादने यांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे.

७) **स्थलांतर रोखणे:** ग्रामीण भागातील युवकांना त्यांच्या गावातच रोजगाराची संधी निर्माण करून स्थलांतर टाळणे.

**८) महाराष्ट्र कृषी व ग्रामीण पर्यटन समिती स्थापन करणे.**

**९) गावातील भात आणि "गायरान" जमिनीचा वापर करणे.**

**१०) नैसर्गिक वातावरणाचा अनुभव घेण्यासाठी इत्यादी**

.

**भारताच्या कृषी पर्यटनातून रोजगाराची संधी:**

कृषी पर्यटन एक उदयोन्मुख क्षेत्र नव्याने उदयास येत आहे, भारतामध्ये विशेषतः ग्रामीण भागात रोजगार निर्माण करण्यास महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. कृषी पर्यटनामुळे केवळ शेतकऱ्यांना आर्थिक लाभ होतो असे नाही तर आजचा तरुण जो रोजगारासाठी शहराकडे धावत आहे त्याला पुन्हा: शेतीकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न आहे. आज स्थानिक समुदाय, शहरी व ग्रामीण लोकांसाठी रोजगार निर्माण करण्याचे एक महत्त्वाचे साधन कसे ठरत आहे ते पुढील मुद्यावरून अधिक स्पष्ट होताना दिसते .

**१) शेतकऱ्यांना रोजगाराची संधी:** कृषी पर्यटनामुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळवण्याची संधी मिळते. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतावर पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी विविध सेवा पुरवता येऊ शकतात:

**अ) शेती प्रशिक्षण देणे:** शेतकऱ्यांनी आपल्या शेतावर पर्यटन कार्यक्रम आयोजित करून पर्यटकांना जैविक शेती, सेंद्रिय शेती, आणि शेतकामाच्या कार्यशाळेचे आयोजन करता येते.

**ब) स्थानिक उत्पादने विक्री**: शेतकऱ्यांना पर्यटकांना स्थानिक उत्पादनांचे विक्री करणे शक्य होऊ शकते, जसे की ताजे फळ, भाज्या, शेतमाल, हस्तकला इत्यादी.

**क) शेत पर्यटनाचे आयोजन:** शेतकऱ्यांना शेत पर्यटनासाठी मार्गदर्शन, ताजे खाद्य पुरवठा, आणि शेतामध्ये शेतकर्या- सोबत पर्यटकांना कार्य करण्याचे निमंत्रण देणे.

**२) स्थानीय समुदायासाठी रोजगार संधी:** कृषी पर्यटनामुळे स्थानिक समुदायालादेखील अनेक प्रकारच्या रोजगाराच्या संधी मिळतात.

**३) पर्यटन गाईड आणि सहाय्यक कर्मचारी:** कृषी पर्यटन स्थळावर पर्यटकांना मार्गदर्शन करणारे गाईड, पर्यटकांची सेवा करणारे कर्मचारी, साफसफाई आणि देखभाल करणारे कर्मचारी यासाठी रोजगार उपलब्ध होतो.हॉटेल व रेस्टॉरंट्स: स्थानिक हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि रेस्टॉरंट्समध्ये काम करणे. पर्यटकांना पारंपरिक खाद्यपदार्थ, स्थानिक जेवण आणि ग्रामीण खाद्यसंस्कृतीचा अनुभव देणे.हस्तकला विक्री,स्थानिक कला आणि हस्तकला विक्री केंद्रे चालवणे, जिथे स्थानिक शेतकरी कुटुंबीय आपले हस्तनिर्मित वस्त्र, हंडी, धातूचे पदार्थ इत्यादी विकू शकतात व त्यातून रोजगार प्राप्त करू शकतात.

**४) प्रशिक्षण व शैक्षणिक क्षेत्रात रोजगार:** कृषी पर्यटन माध्यमातून पर्यटन क्षेत्रातील विविध भागांमध्ये कार्य करण्यासाठी शेतकऱ्यांना किंवा स्थानिक लोकांना प्रशिक्षित करण्याचे काम करणारे प्रशिक्षण केंद्रे उभारता येतात.त्यातून शेतीसंबंधी शैक्षणिक कार्यक्रम, शेतकऱ्यांसाठी, पर्यटकांसाठी आणि स्थानिक लोकांसाठी कृषी पर्यटनाच्या अंतर्गत शैक्षणिक व कार्यशाळा आयोजित करणारे प्रशिक्षण दाते आणि शिक्षक यांना रोजगार मिळू शकतो.

**५) संस्थात्मक व व्यवस्थापन कार्ये:**

**अ) पर्यटन व्यवस्थापक:** कृषी पर्यटन स्थळांवर व्यवस्थापन, आरक्षण, सेवा, आणि प्रकल्प व्यवस्थापन करणारे व्यवस्थापकांची आवश्यकता असते.यात रोजगार प्राप्त होतो. मार्केटिंग व प्रचार: कृषी पर्यटन स्थळे किंवा फार्म हाऊससाठी मार्केटिंग आणि प्रचार कामे करणारे लोक. इंटरनेट, सोशल मीडिया, आणि इतर विपणन मार्गांचा वापर करून पर्यटनाच्या विक्रीसाठी प्रचार करणे यात तरुण वर्गाला रोजगारसंधी आहे.

**ब) सर्विसेस (विजिटर मॅनेजमेंट):**पर्यटकांच्या स्वागत आणि व्यवस्थापनासाठी कर्मचारी, सुरक्षा, मार्गदर्शन इत्यादी सेवा प्रदान करणारे लोक यांना रोजगार प्राप्त होतो.

**६) सततच्या रोजगाराची संधी:** कृषी पर्यटन क्षेत्रात नवनवीन रोजगार संधी तयार होऊ शकतात, जसे की कृषी आधारित इको-टूरिझम, फार्म होलिडे प्रोग्रॅम्स, रिसॉर्ट्स व ट्रॅव्हल एजन्सींच्या सहकार्याने नवीन प्रकल्पांचे सुरूवात. यामुळे सतत रोजगार निर्माण होईल.

**७) योजनेतील सरकारी समर्थन:** सरकारने कृषी पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना आणि प्रोत्साहन प्रदान केली आहे. शेतकऱ्यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन देणाऱ्या संस्थांना आर्थिक मदतीचा व शासनाच्या योजनांचा लाभ घेता येतो. यामुळे शेतकऱ्यांना आणि स्थानिक समुदायाला रोजगाराची संधी मिळू शकते.

**कृषी-पर्यटन केंद्रे कोण स्थापन करू शकतात ?**

१. वैयक्तिक शेतकरी
२. कृषी सहकारी संस्था
३. राज्यातील कृषी विज्ञान आणि संशोधन केंद्रे
४. कृषी महाविद्यालये
५. कृषी विद्यापीठे
६ . शेतकरी भागीदारी संस्था
७. कोणतीही कंपनी
८. सेंद्रिय शेतकरी
९. कोणत्याही कृषी व्यवसायात गुंतलेला शेतकरी इत्यादी.

**कृषी-पर्यटनाचे फायदे:**

**फार्म टूर, भेटी व आर्थिक प्रभाव:**

फार्म टूर, भेटी व आर्थिक प्रभाव हा कृषी-पर्यटन क्रियाकलापाचा हा एक प्रकार आहे. तशी हि संकल्पना खूप विस्तृत व गतिमान आहे, कृषी पर्यटन हे मानवाला निसर्गाशी आणि त्यांच्या अन्नाच्या उत्पत्तीशी जोडतात. फार्म टूर आणि भेटी हा कृषी-पर्यटनाचा मुख्य घटक आहेत, जो पर्यटकांना आपले अन्न कोठून येते ? ते कसे पिकवले जाते? शेतीचे जीवन कसे आहे? हे प्रत्यक्ष पाहण्याची संधी व अनुभव देते. कृषी पर्यटनातून देशाच्या आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय समृद्धीचे दर्शन घडते. फार्म टूर आणि भेटी यातून कृषी-पर्यटनाचे फायदे पुढील प्रकारचे मिळतात :-

**१) शैक्षणिक पैलू:**

अ) पर्यटकांना शेती, फलोत्पादन आणि पशुपालन बद्दल ज्ञान मिळते. शिकण्याच्या संधी मिळते.

ब) अनेक फार्म्स शैक्षणिक क्षेत्र सहली प्रदान करण्यासाठी शाळांसोबत भागीदारी करतात.

**२) सांस्कृतिक अनुभव:**

अ) पर्यटक स्थानिक परंपरा आणि ग्रामीण जीवनातील चालीरीती याचा अनुभव घेतात .

ब) शेतात अनेकदा ऐतिहासिक शेती तंत्र आणि वारसा वाणांचे प्रदर्शन केले जाते.

**३) मनोरंजनात्मक क्रियाकलाप:**

अ) घोडेस्वारी, हायकिंग आणि पक्षी निरीक्षण यासारख्या मैदानी साहस गोष्टी शिकायला मिळतात.

ब) सतत असणाऱ्या शहरी धावपळीतून थोडी विश्रांती मिळते.

क) शेतात अनेकदा पर्यटकांना निसर्गाचा आनंद घेण्यासाठी पायवाटाने फिरता येते.

ड) पर्यटकांना शेती सहलीचा आनंद मिळतो.

**४) आर्थिक प्रभाव:**

अ) कृषी पर्यटनातून शेतकऱ्यास उत्पन्नाचे साधन प्राप्त होते.

ब) कृषी पर्यटनातून स्थानिक अर्थव्यवस्था बळकट होते.

**५) पर्यावरण जागरूकता:**

अ) पर्यटक शाश्वत शेती पद्धती आणि पर्यावरणीय कारभाराविषयी शिकतात.

ब) कृषी पर्यटनातून निसर्गाचे व काही दुर्मिळ नैसर्गिक प्रजातीचे संवर्धनाचे प्रयत्न होतात.

**६) आरोग्य आणि निरोगीपणा:**

अ) कृषी पर्यटनातून नैसर्गिक वातावरणात योग आणि ध्यानसाधना यासह निरोगीपणाचे कार्यक्रम घेता येतात.

ब) ताजे व सेंद्रिय उत्पादन खाण्याची संधी मिळते. निरोगी जीवन जगण्यास प्रोत्साहन मिळते.

**७) शेती उपयोगी सामुदायिक कार्यक्रम घेता येतात.**

**८) कृषी विकासासाठी विद्यापीठे आणि संशोधन संस्थांसोबत भागीदारी असा नवा उपक्रम राबविता येतो.**

**९) शेती उत्पादने आणि सेवांसाठी ब्रँड ओळख निर्माण करण्यात मदत होते.**

**१०) पर्यटक स्थानिक अर्थव्यवस्थेला आधार देणाऱ्या फार्म शॉपमधून ताजे उत्पादन, घरगुती वस्तू आणि स्मृतीचिन्ह खरेदी करू शकतात.इत्यादी.**

**कृषी पर्यटनापुढील आव्हाने:**

महाराष्ट्रात तसेच देशात कृषी पर्यटनातून रोजगार व आर्थिक विकासाला मोठी संधी प्राप्त होत असली तरी देखील कृषी पर्यटना समोर आज अनेक आव्हाने उभी आहेत.

१) ग्रामीण भागातील पर्यटन स्थळांना आवश्यक असलेल्या आधारभूत सुविधांचा अभाव आहे. जसे की वाहतूकव्यवस्था , निवासव्यवस्था, २४ तास वीज पुरवठा, शुद्ध पाणी व स्वच्छता.इ.

२) शेतकऱ्यांना कृषी पर्यटनाच्या कार्यपद्धतीसाठी पुरेशी माहिती व प्रशिक्षण नसल्याने त्यांना पर्यटकांशी संवाद साधण्यात समस्या येऊ शकतात.

३) ग्रामीण भागात पर्यटन प्रशिक्षणव्यवस्था म्हणावे तसे विकसित नाही. पक्के रस्ते, वाहतूक, आणि इन्फ्रास्ट्रक्चर यांचा विकास आवश्यक आहे.

४) अनेक शेतकरी एकाच प्रकारच्या उत्पादनात गुंतलेले आहेत,त्याचा परिणाम वाढत्या उत्पादनामुळे शेतमालाला योग्य भाव मिळत नाही.म्हणून शेतीतील विविधता निर्माण करून अधिकाधिक पर्यटकांना आकर्षित करणे.

५) कृषी पर्यटनाचे एक ठोस धोरण तयार करणे आणि शेतकऱ्यांना त्यावर मार्गदर्शन देणे आवश्यक आहे.

या प्रकारची आव्हाने आज कृषी पर्यटना पुढे आहेत.

**महाराष्ट्र राज्यातील कृषी-पर्यटन धोरणे:**

देशात कृषी-पर्यटन धोरणे कृषी क्षेत्रातील पर्यटन क्रियाकलापांना चालना देण्यासाठी आणि त्यांचे नियमन करण्यासाठी तयार केली गेली आहेत. ही धोरणे प्रदेशानुसार बदलतात आणि अनेकदा ग्रामीण भागाचा विकास या कृषी पर्यटनातून होतो. **देशात ITDC (Indian Tourism Development Corporation - ITDC)** आणि महाराष्ट्र राज्यात **MTDC (Maharashtra Tourism Development Corporation -MTDC)** हे दोन्ही पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. ITDC राष्ट्रीय स्तरावर भारतातील पर्यटन स्थळांचा प्रचार करते आणि हॉटेल्स, रिसॉर्ट्स व ट्रॅव्हल एजन्सीचा संचालन करते, तर MTDC महाराष्ट्र राज्याच्या पर्यटन स्थळांचा विकास करते आणि इको-टूरिझमसाठी पायाभूत सुविधा पुरवते. या संस्थांची कार्ये देशाच्या पर्यटन अर्थव्यवस्थेच्या विकासात आणि स्थानिक रोजगार निर्मितीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका निभावतात.

देशात महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने **6 सप्टेंबर 2020** रोजी कृषी-पर्यटन धोरणाला मंजुरी दिली आहे. **कृषी-पर्यटन धोरण लागू करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य म्हणून ओळखले जाते.** गेल्या दोन दशकांपासून सरकार अनेक संस्था, संघटना आणि व्यक्तींकडून कृषी-पर्यटनविषयक स्वतंत्र धोरण तयार करत आहे. यानंतर कृषी-पर्यटन विकास संस्था (ATDC), महाराष्ट्र राज्य कृषी आणि ग्रामीण पर्यटन सहकारी महासंघ (MART), जुन्नर पर्यटन विकास संस्था, राज्यातील इतर पर्यटन क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था आणि काही व्यक्तींनी कृषी-पर्यटन धोरणाचा पाठपुरावा केला. यासह महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि पर्यटन संचालनालय मोलाची भूमिका बजावत आहेत. कृषी पर्यटन विश्व 2017 पासून राज्यात कृषी-पर्यटनाला चालना देत आहे. मात्र राज्य सरकार हे धोरण मंजूर करण्यात संथ गतीने काम करत असले तरी ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी ते फायदेशीर ठरणार आहे. महाराष्ट्र मंत्रिमंडळाने सप्टेंबर 2020 मध्ये पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला कृषी पर्यटन धोरण मंजूर केले आहे.

**निष्कर्ष:**

भारतामध्ये कृषी पर्यटन हे एक विकसित होत असलेले क्षेत्र आहे. महाराष्ट्र, कर्नाटका, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, गुजरात आणि तमिळनाडू यासारख्या राज्यांमध्ये कृषी पर्यटन विकासासाठी योजना आणि धोरणे तयार केली गेली आहेत. कृषी पर्यटन जी एक नवीन धारणा आहे, त्याचा उद्देश पर्यटकांना कृषी क्षेत्राच्या पद्धतींना आणि जीवनशैलीला सामोरे आणणे हा आहे. कृषी पर्यटन हा एक महत्त्वपूर्ण उद्योग होऊ शकतो जो भारताच्या ग्रामीण क्षेत्राला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर एक नवा दृष्टिकोन देऊ शकतो. या क्षेत्राच्या विकासासाठी विविध कृषी फार्म्स, ग्रामीण रिसॉर्ट्स आणि कृषी प्रशिक्षण केंद्रे स्थापित केली जात

आहेत, जे पर्यटकांसाठी एक आकर्षण ठरत आहे. आणि शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यास मदत होणार आहे. बारामतीतील कृषी-पर्यटन उपक्रम भारतभर अशाच प्रकल्पांसाठी एक मानक बनला आहे. या मॉडेलने पंजाब, केरळ आणि हिमाचल प्रदेश, अशाच कृषी-पर्यटन पद्धतींचा अवलंब करण्यास प्रेरित केले आहे,

**संदर्भसूची:**

१. Prof.Dr.K.N.Dhumal & Dr.Sayyed Iliyas (2024) Nirali Prakashan,Pune.
२. Dev, Mahendra S. (1996), Agricultural Policy Framework for Maharashtra : Issues and Options, Proceeding/Project Report No. 21, July 1996, Indira Gandhi Institute of Development Research, Mumbai.
३. Maharashtra Krishi Paryatan Vistar Yojana 2008, A.T.D.C.Pune.
४. https://tourism.gov.in/
५. https://en.wikipedia.org/
६. Government of India. (2022). Report on Rural Tourism Development.
७. Maharashtra Agro-Tourism Development Corporation (2023). Annual Report.
८. Kerala Tourism Board (2023). Eco-Tourism and Agro-Tourism Integration.
९. Academic Journals and Case Studies on Agro-Tourism in India.